Reading Room
Nutan Mahavidyalaya
SAILU

सकाळ परभणी
TODAY
बुधवार
२६ ऑक्टोबर २०१६
33.0°C / 17.5°C



सेलू : येथील नूतन महाविद्यालयात आयोजित महिला सुरक्षा शिबिरात मार्गदर्शन करताना उपविभागीय पोलिस अधिकारी रेणुका वागळे व्यासपीठावर डॉ.एस.एम.लोया, प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, जे.जे.राठोड, प्रा.वसंत पांचाळ, गिरीश लोडाया.

# महिला सुरक्षा शिबिरात विद्यार्थीनींचा सहभाग

सेलू, ता.२५ (बातमीदार) : येथे उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय व नूतन महाविद्यालय सेलू यांच्या वतीने 'महिला सुरक्षा शिबिर' ता.२३ ते २८ दरम्यान नूतन महाविद्यालय आयोजित करण्यात आले.

या शिबिरात १६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यात स्वंय संरक्षणासाठी कराटे शिबिर व कायदे विषयक माहिती देण्यात येत आहे. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी नूतन शिक्षण संस्थेंचे अध्यक्ष डॉ. एस. एम. लोया, उपविभागीय पोलिस अधिकारी रेणुका वागळे, प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, पोलिस निरीक्षक जे. जे. राठोड, शंकर पांढरे, डॉ. प्रा. वंसत पांचाळ, प्रा. व्ही. एच. काळे, गिरीश लोडाया यांची प्रमुख उपस्थित होती. या प्रसंगी श्रीमती वागळे म्हणाल्या, की विद्यार्थ्यांनींनी आपला आत्मविश्वास वाढून स्वंम सिद्ध व्हावे, मुलींवर होणाऱ्या अन्यावर विरोध लढा देऊन स्वतः चे रक्षण करावे.

शिबिरास मार्गदर्शन फिरोज पठाण, प्रा. नागेश कान्हेकर, गणेश माळवे, प्रा. के. के. कदम, प्रा. हिसे हे करीत आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोहन बोराडे यांनी केले, सूत्रसंचालन अर्चना पत्की यांनी केले, आभार प्रदर्शन प्रा. सुषमा सोमाणी यांनी मानले.